# बृहन्मुंबई महानगरपालिका

शेठ व्ही.सी.गांधी आणि एम.ए.व्होरा महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

**क्र.एचओ/आरजीएच/ ७७७९ /आ-१ दि.१५.०७.२०२४**

# सूचना

"

राजावाडी रूग्णालयात अतिदक्षता विभागाच्या बाजुला असलेल्या मानसोपचार विभागाचे स्थानांतरण करुन हाय डिपेन्डन्सी युनिट सुरु करण्यासाठी "परिचारीका" या संवर्गातील १८ अतिरिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता मा.अतिरिक्त आयुक्त (प.उप) यांचा क्र.अति.आयुक्त/प.उप./५२२४/डी दि.०४.०३.२०२४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार १८ पदांकरीता खालील अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे** :- **१८**
- **मानधन** :- **रू.३०,०००/-**
- **शैक्षणिक अर्हता** :- HSC (Science), General Nursing Midwifery 3 Years Course, MNC Registration, MS-CIT & Knowledge of Marathi & English
- **अर्ज करण्याचा कालावधी** :- **दि.२२.०७.२०२४ ते दि.२६.०७.२०२४.**
- **मुलाखतीचा दिनांक** :- **दि.३१.०७.२०२४(सकाळी ११.०० वाजता)**

अर्जदारांनी अर्ज **दि.२२.०७.२०२४ ते दि.२६.०७.२०२४** पर्यत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत**.)

सदर नियुक्ती हया १ वर्षाकरीता (एका वेळी सहा महिन्यांच्या) (४५ दिवसानंतर एक दिवसाचा खंड देऊन) अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रूग्णालय, घाटकोपर**

शैक्षणिक अर्हता

सदर पदाची शैक्षणिक अर्हता–बारावी (सायन्स), जनरल नर्सिंग मिडवाइफरी ३ वर्षाचा कोर्स (HSC(Science),General Nursing Midwifery 3 Years Course (GNM),

MNC Registration (Maharashtra Nursing Council) ,
संगणक MSCIT परिक्षा उत्तीर्ण असावा ,
१०० गुणांची मराठी विषय घेऊन उत्तीर्णअसावा,

- निवडीचे निकष –शैक्षणीक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.
- प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

अटी व शर्ती

- कंत्राट कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्यदेण्यात येणार नाही. तसेच त्यांची सेवा त्यांना पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. भविष्यात त्यांना त्यांच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.
- तिन्ही पाळीमध्ये काम करावे लागेल.
- संबंधीत आस्थापना प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी उमेदवारांची सेवा कोणत्याही पूर्वसूचना दिल्या शिवाय समाप्त करण्यात यईल.
- सदर नियुक्त्या ह्या निव्वळ कंत्राटी तत्वावर असल्याने त्यांना महानगरपालिकेत कायम स्वरुपी तत्वावरील नोकरीचा हक्क असणार नाही.
- सदर नियुक्त्या ह्या निव्वळ कंत्राटी तत्वावर असल्याने त्यांना महानगरपालिकेत कायमस्वरुपी तत्वावरील नोकरीचा हक्क असणार नाही.
- उमेदवारास कोणत्याही मा. न्यायालयात जाता येणार नाही.